# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 05 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०५ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

हवामान बदल, नैसर्गिक आपत्ती आणि संसाधनांचा दुरुपयोग यासारख्या आव्हानांना तोंड देण्यासाठी योजना तयार कराव्यात असं आवाहन, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कृषी शास्त्रज्ञांना केलं आहे. त्या आज भुवनेश्वर इथं ओडिशा कृषी आणि तंत्रज्ञान विद्यापीठाच्या चाळीसाव्या दीक्षांत समारंभात बोलत होत्या. अशा योजनांमुळे शेतकऱ्यांना मदत होईल तसेच भारतीय अर्थव्यवस्थेचा वेग वाढण्यासही मदत होईल, असं राष्ट्रपतींनी नमूद केलं.

****

राज्यसभेत आज कामकाज सुरु होताच भाजप खासदार सुधांशू त्रिवेदी यांनी परदेशातून राष्ट्रहितावर होत असलेल्या संशयास्पद हल्ल्याचा मुद्दा उपस्थित केला. सभापती जगदीप धनखड यांनी ही गंभीर बाब असल्याचं सांगून, त्रिवेदी यांना बोलण्याची परवानगी दिली. यावर विरोधी पक्षांनी आक्षेप घेत, त्यांच्या मुद्यांवर देखील बोलू देण्याची मागणी केली. यावरुन गदारोळ झाल्यानं सभागृहाचं कामकाज एका तासासाठी स्थगित झालं होतं.

****

देशभरात १५७ विमानतळ कार्यरत असल्याची माहिती, नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राम मोहन नायडू यांनी दिली. लोकसभेत ते आज पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने देशभरात विमानतळाचं जाळं विस्तारलं असून, भारताच्या देशांतर्गत हवाई वाहतुकीने एकाच दिवसात पाच लाखांहून अधिक प्रवाशांचा टप्पा गाठला असल्याचं, नायडू यांनी सांगितलं.

****

महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून भारतीय जनता पक्षाचे नेते देवेंद्र फडणवीस आज शपथ घेणार आहेत. मुंबईत आझाद मैदानात आज संध्याकाळी साडे पाच वाजता होणार्या या समारंभात राज्यपाल सी पी राधाकृष्णन फडणवीस यांना पद आणि गोपनियतेची शपथ देतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह इतर केंद्रीय मंत्री आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीशासित राज्यांचे मुख्यमंत्री यावेळी उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान, शपथविधी सोहळ्यासाठी आझाद मैदान सज्ज झालं आहे. आझाद मैदान आणि लगतचा परिसर सुशोभित करण्यात आला असून, भाजपाच्या, शिवसेनेच्या आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या झेंड्यांनी आणि फलकांनी हा परिसर फुलून गेला आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी आज सकाळी सिद्धिविनायक मंदिरात जावून दर्शन घेतलं. त्यानंतर त्यांनी मुंबईची ग्रामदेवता मुंबा देवी मंदिरातही देवीचं दर्शन घेतलं. यावेळी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, नवनिर्वाचित आमदार कालिदास कोळंबकर, राहुल नार्वेकर आदी नेते उपस्थित होते.

****

विकास प्रक्रियेत मदत करण्यासाठी जागतिक बँकेच्या कार्यकारी संचालक मंडळानं राज्याला तीन डिसेंबर रोजी नव्यानं कर्ज मंजूर केलं आहे. राज्यातल्या मागास जिल्ह्यांचा विकास करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या जागतिक बँकेच्या उपक्रमाचा हा भाग आहे. विकासाची संधी निर्माण करणं, खासगी क्षेत्राला प्रोत्साहन देणं हे याचं उद्दिष्ट आहे. ५० हजार कोटींची राज्याची अर्थव्यवस्था देशातल्या सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. तरीही राज्याच्या जीडीपीपैकी पन्नास टक्के उत्पादन केवळ सात जिल्ह्यांमध्ये होतं. त्यामुळे राज्यातल्या इतर जिल्ह्यांच्या विकासाच्या गतीमध्ये मोठ्या प्रमाणात असमानता आहे. या उपक्रमामुळे राज्याच्या सर्व जिल्ह्यात विकासाचं उद्दिष्ट साध्य करायला हातभार लागेल, असं जागतिक बँकेचे भारतातले संचालक ऑगस्ते तॅनो कौम यांनी सांगितलं.

****

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यभरातून येणाऱ्या अनुयायांसाठी मुंबई महापालिकेने चैत्यभूमीवर पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. पालिकेच्या वतीने नियंत्रण कक्ष, रुग्णवाहिका, आरोग्य सेवा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता, शौचालये आदी सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. चैत्यभूमी परिसरात लावलेल्या एलईडी स्क्रीनवर चैत्यभूमीतून थेट प्रक्षेपण पाहण्याची सोय करण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य

विभागामार्फत अनुयायांना वैद्यकीय सुविधा पुरवण्यात येणार आहेत. चैत्यभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासह सभोवतालच्या कठड्याना रंगरंगोटी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे स्तुपाची सजावटही विविध रंगांच्या फुलांनी करण्यात येत आहे.

दरम्यान, महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशभरातून मुंबईत येणाऱ्या अनुयायांना प्रशासनाच्या सूचनांचं पालन करण्याचं आवाहन, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस, नागसेन कांबळे यांनी केलं आहे.

****

राष्ट्रीय जंतनाशक दिनानिमित्त राज्यात एक ते 19 वर्षे वयोगटातल्या मुलामुलींना जंतनाशक गोळ्या देण्याची मोहीम सुरु करण्यात आली असून, दहा डिसेंबरपर्यंत ही मोहीम सुरु राहणार आहे. नांदेड जिल्हा रुग्णालयात काल राष्ट्रीय जंतनाशक मोहिम राबवण्यात आली. जिल्ह्यातल्या शाळांमधल्या एक ते १९ वर्षे वयोगटातल्या बालकांना जंतनाशक गोळी खाऊ घालण्यात आली. काल गैरहजर असलेल्या बालकांना येत्या दहा तारखेला जंतनाशक गोळी देण्यात येणार आहे.

गडचिरोली जिल्ह्यात दहा तालुक्यांमधल्या एक लाख ७२ हजार मुलांना काल ठिकठिकाणी आरोग्य विभागाच्या वतीनं जंतनाशक गोळी देण्यात आली.

****

भारत आणि ऑस्ट्रेलियादरम्यान सुरु असलेल्या बॉर्डर - गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला दुसरा सामना उद्यापासून ॲडलेड इथं खेळला जाणार आहे. पहिला सामना जिंकून भारत मालिकेत एक - शून्यनं आघाडीवर आहे.

****